# दे दान सुटे गिराण !

**डॉ. मनोज भाटवडेकर**

**पालकांच्या वागण्यातून उमटणाऱ्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे संस्कार मुलांवर नकळत होत असतात. नकुलच्या हातून घडलेल्या मजेशीर वर्तनामागे काय पार्श्वभूमी होती?**

''हे असे प्रसंग दिवसेंदिवस वाढतच राहतील नाही. डॉक्टर? पुढच्या पिढीचं कसं होणार आहे कोण जाणे.'' समोर बसलेल्या आजोबांच्या बोलण्यातून एकदम वैश्विक पातळीवरची चिंता जाणवत होती. ''हल्ली पैशाने सगळी कामं होतात हे वाक्य सगळीकडून ऐकायला मिळतं. होत असतीलही. पण दहा वर्षांच्या मुलाने हे वाक्य असं आचरणात आणावं? खरंच सांगतो डॉक्टर, या प्रसंगानंतर माझी झोप उडालीय.''

त्यांचा चौथीत शिकणारा नातू-नकुल. प्रसंग घडला होता. तोही विचित्रच. एका बाजूने पाहिलं तर मजेशीर वाटावा असा. पण त्याच्या आजोबांच्या चष्म्यातून पाहिलं तर गंभीर वाटणारा. नकुलच्या घरी तो, त्याचे आईवडील आणि आजोबा असे राहत होते. आईवडील कामाच्या निमित्ताने दिवसभर घराबाहेर असल्यामुळे आजोबांवर त्याच्या पालकत्वाची जबाबदारी आपोआपच पडली होती. एक दिवस शाळेतून बोलावणं आलं-

''पालकांनी येऊन भेटावं. एका गंभीर बाबतीबद्दल चर्चा करायची आहे.'' दुपारी शाळेत जाऊ शकत होते अर्थातच आजोबा.

''मी जाऊन मुख्याध्यापिकांना भेटलो. त्यांच्याबरोबर नकुलच्या वर्गशिक्षिकाही होत्या. नकुलने म्हणे वर्गातल्या कुठल्यातरी, मुलाचं पेन चोरलं. तेही नुसतीच गंमत म्हणून. दोन दिवस त्या मुलाने शोध घेतल्यावर कशी कोण जाणे पण चोरी उघडकीला आली. नकुलच्या बॉक्समध्ये त्या मुलाचं पेन सापडल्याबरोबर त्याने वर्गशिक्षिकांकडे तक्रार केली. वर्गशिक्षिकांनी नकुलता सांगितलं की, तुला मुख्याध्यापिकांकडे या गोष्टीचं स्पष्टीकरण द्यावं लागेल आणि या कृत्याबद्दल शिक्षाही घ्यावी लागेल तर नकुलने काय करावं? डॉक्टर, तुम्ही कल्पनाही करू शकणार नाही. मलाही असाच धक्का बसला होता हे ऐकून.'' बोलता बोलता आजोबांनी एक पॉज घेतला.

'सांगा तुम्ही, माझी काहीही ऐकण्याची तयारी आहे.'

''सांगतोच, नकुलने खिशातून पन्नास रुपयांची नोट काढली आणि ती बाईंना देऊ केली. वर बाईंना सांगतो कसा- सध्या माझ्याकडे एवढेच आहेत. तुम्हाला आणखी पाहिजे असतील तर मी पुढच्या आठवड्यात देऊ शकेन. पण प्लीज, ही गोष्ट हेडमिस्ट्रेसना सांगू नका. आणि माझ्या घरीही कळवू नका. बाईंनी ताबडतोब ही गोष्ट हेडमिस्ट्रेसना कळवली. त्यांनी लगेच घरी चिठ्ठी पाठवली. काय, डॉक्टर? बसला ना धक्का हे ऐकून?''

डॉक्टरांना धक्का बसला की नाही हा मुद्दा अर्थातच गौण होता. 'तुम्ही हे ऐकून अस्वस्थ होणं हे साहजिकच आहे.'

''अस्वस्थ हा शब्द फार सौम्य आहे. मी हादरलोय. अक्षरशः हादरलोय. अहो, आम्ही चौथीत होतो तेव्हा शिक्षकांकडे मान वर करून बघायची टाप नव्हती आमची, आणि या पोराने सर्रास लाच देऊ करावी? आणखी वर सौद्याची भाषा? आणखी पाहिजे असतील वगैरे?'' 'तुम्ही लाच हा शब्द वापरलात. एका लहान मुलाच्या बाबतीत हा शब्द वापरणं कितपत योग्य आहे असं तुम्हाला वाटतं? त्याला लाच म्हणजे काय ते कळतंय का?' ''बरोबर आहे डॉक्टर, तुम्ही म्हणता ते मलाही पटतं की लाच म्हणजे काय हे कळण्याचं त्याचं वय नाही. पण ते नसूनही त्याने शिक्षकांना अशा पद्धतीने पैसे देऊ करणं म्हणजे मनोवृत्ती तीच झाली, नाही का? दुसरं असं की आता जर हे करायचं त्याला सुचत असेल तर पुढे काय होणार? तरी मी आमच्या मुलाला-सुनेला सांगत असतो की, तुम्ही त्याच्याकडे लक्ष द्या म्हणून. माझं वय आता पासष्टच्या पुढे आहे. मलाही आता झेपत नाही.''

'मी तुम्हाला एकंदरीत कौटुंबिक परिस्थितीबद्दल, वातावरणाबद्दल, विचारणारच होतो.'

''मी तुम्हाला सांगितलंच की घरात आम्ही तिघे आणि नकुल असे असतो. माझ्या मुलाबद्दल आधी सांगतो. पहिल्यापासूनच तो हुशार आहे. इंजिनीयर झाला. टाटासारख्या कंपनीत चांगल्या हुद्यावर नोकरीला होता. पण नोकरी करायची म्हणजे कमीपणा हे त्याच्या पहिल्यापासून डोक्यात होतं. त्यामुळे गेल्या वर्षीच त्याने नोकरी सोडून स्वतःचा व्यवसाय चालू केला. तो दिवसभर बाहेरच असतो. नवीन व्यवसाय म्हटल्यावर पूर्ण लक्ष द्यायला हवं ना? सकाळी आठला बाहेर पडतो तो रात्री दहाला घरी येतो. आमची सून-म्हणजे नकुलची आई. बँकेत नोकरीला आहे. ती साधारणपणे नऊला बाहेर पडते ती संध्याकाळी पाचपर्यंत घरी येते. नकुल सकाळी साडेआठला शाळेत जातो तो दुपारी अडीचपर्यंत परत येतो. त्यानंतर तो माझ्याच ताब्यात असतो. पण त्याचं जेवणखाण वगैरे सगळं मीच बघतो. एरवी त्याची काही कटकट नसते. अभ्यासात चांगला आहे. वागायलाही खूप चांगला आहे. म्हणून मला त्याच्या या घटनेचं जास्त वाईट वाटतं. आता राहता राहिलो मी. मी इमानेइतबारे म्युनिसिपालटीत नोकरी केली. मला रिटायर होऊन सात वर्ष होऊन गेली. बायको दहा वर्षांपूर्वी गेली. तेव्हापासून मी एकटाच आहे म्हणून नकुलला सांभाळण्याची जबाबदारी मी घेतली. तेवढा माझा वेळही चांगला जातो. आणि दुसरं म्हणजे नकुललाही दुसरीकडे ठेवावं लागत नाही.''

'तुम्ही म्हणालात की, नकुलचे वडील बराच वेळ घराबाहेर असतात. मग नकुलची आणि त्यांची गाठभेट होते की नाही?' ''नाही. कशी होणार? येऊन जाऊन रविवारी थोडा वेळ झाली तर, त्याने हा नवीन धंदा चालू केल्यापासून तो अखंड कामाच्या व्यापात बुडालेला असतो. सारख्या पैशाच्या गोष्टी. घरी असो की बाहेर, घरी असला तरी फोनवरून तेच चालू असतं. नकुल कधी काही सांगायला गेला तर उडवाउडवी करतो. आईला नाही तर आजोबांना विचार म्हणून सांगतो. तो मेहनती आहे हे निश्चित. त्याचं फळही त्याला मिळतंय, वर्षभरात उत्तम नफा कमावलाय त्याने. चांगलं आहे. आम्हाला जे जमत नाही ते तो करतोय असं म्हणायचं.''

'तुम्ही त्याच्या या व्यवसायाबद्दल काहीसे नाराज दिसता. बरोबर?'

''तुम्ही बरोबर ओळखलंत डॉक्टर. खरं तर आमच्या दोघांमध्ये काही बाबतीत मतभेदच आहेत. मी मुळात त्याने धंदा चालू करण्याच्या विरूद्ध होतो. त्याची नोकरी काही वाईट नव्हती. दोघांचं मिळून उत्पन्न चांगलं होतं. माझा बँक बॅलन्स चांगला आहे. शिवाय माझी पेन्शन येतेच. त्यामुळे माझा खर्च त्यांच्या डोक्यावर नाही. मी त्याला सांगत होतो की, तुम्ही आहे हे आयुष्य चांगलं सुखसमाधानाने जगा, कुणी सांगितल्या आहेत नसत्या कटकटी ओढवून घ्यायला? तर त्याचं म्हणणं असं की तुमची टिपिकल मध्यमवर्गीय विचारसरणी आहे. अशाने आपली प्रगती होणार कशी? कायम कुणाची तरी नोकरी करत राहायची हे किती अपमानास्पद आहे ! असं आपलं त्याचं म्हणणं, तेही मी मान्य केलं. म्हटलं, ठीक आहे तुझा जीव नोकरीत नसेल रमत तर दे सोडून. पण तो ज्या पद्धतीने धंदा करतोय त्याबद्दल माझा आक्षेप आहे.''

'म्हणजे?'

''दुसरं काय? जे नकुलने केलं तेच. याला पैसे चारले, त्याला पैसे चारले, त्याला तो बिझनेस टॅकटिक्स् म्हणतो. पैसे दिले की सगळी कामं होतात या गोष्टीवर त्याचा ठाम विश्वास आहे. सगळ्यात वाईट म्हणजे तो घरात नकुलसमोरही आपली मतं उघडपणे व्यक्त करतो. कधी कधी नकुलला सांगतोदेखील बढाई मारल्यासारखा – बघ आज इतका इतका धंदा झाला. मी त्याला अनेकदा यावरून टोकलंय. असल्या अनैतिक मार्गांनी केलेला धंदा किती दिवस टिकेल? तर त्याच म्हणणं– नीती– अनीतीच्या कल्पनाच बदलल्यात आता. तुमच्याकडे पैसा असणं हे महत्त्वाचं– तो कसा मिळवता याच्याशी काय कर्तव्य? डॉक्टर, ही सल माझ्या मनात सतत असते.''

'नकुलच्या आईचं या बाबतीत काय मत आहे?' ''मी तिला खूपच शहाणी म्हणेन. तिलाही या गोष्टी पटत नाहीत. ती अतिशय प्रामाणिक आणि मेहनती आहे. तिलाही चांगला पगार आहे. पण हा तिला कस्पटासमान वागवतो. ती नोकरी करते ना? तिला तो कायम सांगत असतो – तू एवढा घाम गाळून शेवटी किती कमावणार? त्यात पुन्हा टॅक्स कापला जातो, आमच्या धंद्यात कसं असत – टॅक्स किती भरायचा हे आपल्यावर आहे. ब्लॅकमनीच्या गोष्टी करत असतो. ती काय करणार बिचारी? तिला सगळंच सांभाळावं

लागतं. पण एक गोष्ट नक्की जाणवतीय. नकुलचा ओढा हा आईपेक्षा बापाकडे जास्त आहे. तिने सांगितलेल्या गोष्टींपेक्षा त्याने सांगितलेल्या नकुलला जास्त पटतात. काय करणार? इलाज नाही.''

'बरं एक सांगा. नकुलच्या खिशात पन्नास रूपये आले कुठून?' ''बापाचे लाड, दुसरं काय? हल्ली तो कौतुकाने पॉकेटमनी देतो. खरं म्हणजे त्याला पैसे लागताहेत कुठे? शाळेच्या बसने येतो, जातो. खायचा डबा जवळ असतो. पण जवळ पैसा बाळगणं हे प्रतिष्ठेचं लक्षण आहे असं आमच्या चिरंजिवाचं म्हणणं.'' नकुलचे आजोबा बोलता बोलता सुन्न झाले होते.

नकुलच्या आईवडिलांशी नक्कीच सविस्तर बोलायला हवं. नकुलच्या वर्तनातला निरागस भाग हा त्याच्या वयाचा आहे. त्यातलं गांभीर्य त्याला कळत नाहीये हे जरी खरं असलं तरी तो ज्या गोष्टींचं अंधानुकरण करतोय ती गोष्ट खोलवर रूजू पाहतेय हेही तितकंच खरं. नकुलच्या वडिलांची पैसे कमावण्याच्या बाबतीतली भूमिका किती बरोबर, किती चूक याबद्दल वेगवेगळी मतं असू शकतील. पण 'दे दान सुटे गिराण' हा मूलमंत्र सगळीकडे लागू करू पाहणाऱ्या नकुलच्या वडिलांचे नकुलवर होणारे संस्कार योग्य म्हणायचे का? यामध्ये ग्रहण लागू शकेल ते नकुलच्या व्यक्तिमत्व विकासाला– ते सोडवायचं कुणी? आणि त्यासाठी कसलं दान द्यायचं?

**आपलं महानगर , दि. ३० ऑक्टोबर १९९५**
**काही बोलायाचे आहे**